# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक १८ मार्च, २०१३.
## (सकाळी १०.०० ते ११.०० वाजेपर्यंत)

**(शुक्रवार, दिनांक १५ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला प्रस्ताव ) -**

**सर्वश्री. विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री.रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड.आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री.नागो गाणार, भगवान साळुंखे, कपिल पाटील **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

" वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या संघटनांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी परिक्षेच्या कामावर बहिष्कार टाकला असणे, वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना ५ वा वेतन आयोग दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून लागू करणे, विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिल्याप्रमाणे राज्य शासनाने दिनांक १ जानेवारी, २००६ ते ३१ मार्च, २०१० या कालावधीतील ६ व्या वेतन आयोगाची ८० टक्के थकबाकी न देणे, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना महागाई भत्ता न देणे, शिक्षकेत्तरांच्या आकृतीबंधाचा विषय गेली १३ वर्षे प्रलंबित असणे, कायम विना अनुदानित शाळांचा शब्द काढून टाकताना उच्च माध्यमिक शाळांना जाणीवपूर्वक वगळणे, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ च्या मुल्यांकनाच्या निकषामध्ये बदल करण्याचे मान्य करुनही कारवाई न होणे, दिनांक २८ नोव्हेंबर, २००६ च्या विना अनुदानित सेवा कालावधी वरिष्ठ निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याच्या निर्णयातून प्राथमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व सर्व शिक्षकेत्तरांना वगळणे, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना देय वेतनवाढी ४ वर्षापासून बंद करणे, शिक्षकेत्तरांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू न करणे, वेतनेत्तर अनुदानाची मागील ८ वर्षांची थकबाकी नाकारणे, पटपडताळणीच्या अनुषंगाने बंद पडणाऱ्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तरांना संरक्षण व समायोजन नाकारणे, गुणवत्तेच्या नावाखाली सेवेत असलेल्या इयत्ता ६ वी ते ८ वी च्या शिक्षकांसाठी पदवी प्राप्त करण्याची सक्ती करणे, विना अनुदानित शाळांचे मुल्यांकनाचे जाचक निकष शिथील करण्याचे आश्वासन देऊनही शासनाने कारवाई न करणे, विना अनुदानित शाळेत सेवेत असलेले सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण न देणे, परिणामी विना अनुदानित शाळेच्या शिक्षकांनी आत्मदहनाचा इशारा देणे, वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा परिक्षेच्या कामकाजावर बहिष्कार जाहीर केल्यामुळे राज्यातील विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये शासनाविषयी नाराजी निर्माण होणे,

विद्यार्थी हिताचा विचार न करता शासनाने या विषयाकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थी व पालक यांचेवर प्रचंड ताण व तणाव निर्माण होणे, राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या व विना अनुदानित शाळेमधील शिक्षकांच्या उक्त मागण्यांच्याबाबतीत तोडगा काढण्यास शासनास आलेले अपयश, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची उपाययोजना व याबाबतची शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी. "

## (सकाळी ११.१५ वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना (असल्यास).**

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - (असल्यास).**

**चार : लक्षवेधी सूचना-(म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **(मंगळवार, दिनांक १२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना) -**

**श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" बुलढाणा जिल्ह्यातील महत्त्वाकांक्षी जिगांव प्रकल्पाचे कामी 'पहिले पुनर्वसन मग धरण' या शासनाच्या संकल्पनेला बगल देण्यात येणे, पुनर्वसनासंदर्भात कोणतीही ठोस भूमिका शासनाच्यावतीने घेण्यात येत नसल्याची मार्च, २०१३ मध्ये उघडकीस आलेली घटना, या कामाच्या खोदकामात ब्लास्टिंग करताना करण्यात येणाऱ्या विस्फोटांमुळे परिसर हादरुन आजुबाजुच्या घरांची होणारी पडझड, प्रकल्पावर सुरु असणाऱ्या वर्दळीसाठी वापरण्यात येणाऱ्या मार्गावरील अवजड वाहने, जेसीबी कंटेनर, टिप्पर, इत्यादीसह मोठ्या क्रेनच्या वाहतुकीमुळे होत असलेले अपघात, या प्रकल्पाच्या कामात भिंतीमध्ये काळ्यामातीऐवजी पिवळ्या मातीचा तसेच रेतीचा वापर करण्यात येणे, परिणामी भविष्यात या भिंतीमधून साठविलेले पाणी पाझरुन जाण्याची शक्यता, याकडे प्रशासनाचे होणारे दुर्लक्ष, प्रकल्पग्रस्त नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, जिगांव प्रकल्पग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन होण्याबाबत, शासनाने करावयाची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका. "

(२) **सर्वश्री. हेमंत टकले, जयवंतराव जाधव, ॲड. जयदेवराव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" ठाणे जिल्ह्यातील भाईंदर येथील शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (बीएसयुपी) या योजनेअंतर्गत मीरा भाईंदर क्षेत्रातील चार हजार लाभार्थ्यांसाठी बांधण्यात येणारी घरकुल योजना, या योजनेअंतर्गत मीरा भाईंदर क्षेत्रातील जनता नगर व काशी चर्च येथील झोपडपट्टीवासियांना प्रत्येकी २६९ चौरस फुटांचे घर देण्याचा कार्यक्रम आखण्यात येणे, जनता नगर येथील ३६६५ व काशी चर्च येथील ४७१ झोपडीधारकांना या योजनेचा लाभ मिळणार असणे, परंतु या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने ४८ कोटी रुपयांचा दोन वर्षापूर्वी दिलेला निधी अद्यापही अखर्चित असल्याची घटना नुकतीच उघडकीस येणे, परिणामी तेथील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना. "

(३) **ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" मुंबई जिल्हा फुटबॉल असोसिएशनने दिनांक ११ ऑगस्ट, २०१० रोजीच्या पत्राद्वारे वांद्रे (पश्चिम) येथील मैदान क्र.१ हे फुटबॉल खेळण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात म्हाडाला केलेल्या विनंतीनुसार दिनांक १८ नोव्हेंबर, २०११ च्या पत्र क्र. सभुन्य/अंधेरी/मु.म/नाहप्र/ ३८७/११ द्वारे काही अटी व शर्तीच्या अधीन राहून पुढील तीन वर्ष कालावधीसाठी मुंबई जिल्हा फुटबॉल असोसिएशनला देण्याचा झालेला निर्णय त्यानुसार दिनांक १८ फेब्रुवारी २०११ रोजी फुटबॉल असोसिएशनने रुपये ११,१२,१०३/- इतकी रक्कम म्हाडाकडे भरणा करणे, तथापि, दोन वर्षे उलटुन देखील सदर मैदान फुटबॉल असोसिएशनला हस्तांतरीत करण्यात न येणे, यामुळे फुटबॉल असोसिएशनचे झालेले नुकसान व फुटबॉल खेळाडूंमध्ये निर्माण झालेला असंतोष याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. "

(४) **श्री. दिवाकर रावते वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" धरमतर खाडीतून जेएसडब्ल्यू (ईस्पात कंपनी), पीएनपी इत्यादी कंपनीच्या मालाची वाहतूक बोटीने / जहाजाने रात्रंदिवस चालू असणे, वाहतूकीमुळे धरमतर खाडीच्या दोन्ही काठांवर असलेल्या अलिबाग हद्दीतील गावातील लोकांचा मासेमारी हा पारंपारिक व्यवसाय बंद पडणे, हे मच्छिमार सहकारी गेली १४ वर्षे सातत्याने सदरहू कंपन्याविरोधात संघर्ष करीत

असणे, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी मच्छिमार नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, बाधित झालेल्या स्थानिक पारंपारिक मच्छिमार कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच इतर मागण्यांसाठी तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी धरमतर खाडी प्रकल्पबाधित मच्छिमार संघर्ष समितीच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे देण्यात येणे, या सर्व प्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, तसेच शासनाने यासंदर्भात केलेली कार्यवाही व उपाययोजना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

(५) **श्री. मोहन जोशी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" येरवडा जि.पुणे येथील महाराष्ट्र हाऊसिंग बोर्डातील विभागीय क्रीडा संकुलाचे उद्‌घाटन मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते होऊनही सदर क्रीडा संकुलाचे बांधकाम अर्धवट अवस्थेत असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, एका दशकापासून या क्रीडा संकुलाचे बांधकाम संथगतीने सुरू असल्यामुळे परिसरातील नागरीकांना त्याचा वापर करता न येणे, निधीची कमतरता तसेच ठेकेदारांची दिरंगाईमुळे ऑलिपिकच्या धर्तीवर तयार करण्यात आलेले जलतरण तलाव सदोष असल्यामुळे निदर्शनास येणे, तलावाच्या सदोष बांधकामामुळे त्यात जमीनीतून सांडपाणी येणे, त्यामुळे जलतरण तलावांची झालेली दुरवस्था, क्रीडा संकुलात टेनिस कोर्ट, बास्केटबॉल, स्केटींग, जलतरण तलाव, कबड्डी, खो-खो या मैदानी खेळासह जॉगिंग ट्रॅक तसेच बहुउद्देशीय सभागृहात कॅरम व बुध्दीबळाची व्यवस्था असणे, परंतू क्रीडा संकुलाच्या अपुर्ण बांधकामामुळे मुलांना त्याचा काहीही फायदा न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

**पाच : विशेष उल्लेख (असल्यास)- (म.वि.प. नियम १०१-अ अन्वये).**

# मध्यंतर

**सहा : राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस मंत्र्यांचे उत्तर -**

**सात : सन २०१२-२०१३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस)**

खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल :-

**१) मुख्यमंत्री**

**२) उप मुख्यमंत्री**

**३) उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्री**

**४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्री**

**५) गृहमंत्री**

**६) सामाजिक न्याय, भटक्या व विमुक्त जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य मंत्री**

**७) कृषी व पणन मंत्री**

**८) सहकार आणि संसदीय कार्य मंत्री**

**९) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**

**१०) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री**

**११) आदिवासी विकास मंत्री**

**१२) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय मंत्री**

**आठ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी)**

**(१) डॉ. नीलम गोऱ्हे व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

" पुणे शहरात गेल्या वर्षभरात १८६० स्त्रिया तर ७३६ मुली बेपत्ता होण्याच्या घटना घडणे, या बेपत्ता झालेल्या व अपहरण केलेल्या बालकांना अत्यंत वाईट पध्दतीने वागविण्यात येत असून त्यापैकी काही मुलांकडून गैरकृत्ये करवून घेणे, काही मुलांना ठार मारुन त्यांच्या अवयवांचा व्यापार करणे, काही बालकांना दुसऱ्या राज्यात विकणे, अशाप्रकारे बेपत्ता व अपहरण बालकांचे हाल होत असणे, शासनातर्फे बालकल्याणचे अनेक कार्यक्रम राबविण्यात येत असणे, बेपत्ता होणाऱ्या स्त्रिया, मुले व मुली यांचा तपास त्वरीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

**(२) श्रीमती शोभाताई फडणवीस व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

" जिल्हा महसूल विभाग हा शासनाचा कणा असूनही राज्यात ४ अप्पर जिल्हाधिकारी, ७१ उपजिल्हाधिकारी, ८१ तहसिलदार, आणि ४३१ नायब तहसिलदार अशी महसूल खात्यातील तब्बल ५८७ पदे रिक्त असणे, सदरची पदे भरण्याकरिता एमपीएससी पासून ते अनेक मार्ग अवलंबून असले तरी याकडे शासनाचे लक्ष नसणे, सरळसेवेची भरती

एमपीएससी मार्फत होत मात्र त्यांच्याकडे केवळ महसूलच नाही तर अनेक विभागाच्या मागण्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, या विभागात जी पदे रिक्त आहेत त्यात रोहयो, भूसंपादन, करमणूक कर, जिल्हा पुरवठा अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन अशा महत्वाच्या विभागाचा समावेश असणे, आधीच कर्मचारी-अधिकारी काम करीत नसणे त्यातच या रिक्त पदांमुळे मात्र जनतेची अवस्था बिकट होणे, अनेक विकासाची कामे मंदगतीने सुरु असणे तर काही कामे ठप्प होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, या रिक्त जागा तातडीने भरण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही. "

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १६ मार्च, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.